अपराध अधिकारी प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** भाग्य नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0244 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/06/2023 02:26

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 24/06/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/06/2023

**Time From (वेळेपासून):** 14:32 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/06/2023 **Time (वेळ):** 02:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/06/2023 02:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हॉटेल पदमावती,शेतकरी चौक, ,तरोडा नाका नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

10 Total va (चोरीस 30 11

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** आजिनाथ रामदास खेडकर

**(b) Father's Name (वडील चे नाव) :** रामदास

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तिनखडी, ता पाथर्डी ,ता पाथर्डी ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | तिनखडी, ता पाथर्डी ,ता पाथर्डी ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9405912121

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुर्यकांत मारोती कांबळे | | | 1. मायादेवी नगर शिव रोड तरोडा खू,नांदेड ,भाग्य नगर,नांदेड, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रूपयाचे 60 नोटा | 30,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(**चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य **(**रू. मध्ये**))**:

30,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(**इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास**))**:

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत **)**:

दिनांक 25/06/2023

फिर्याद

मी आजिनाथ रामदास खेडकर, वय 32 वर्षे, व्यवसायः गुत्तेदारी, षिक्षणः 12 वी पास, रा. मु.पो. तिनखडी, ता. पाथर्डी , जि. अहमदनगर मो.न. 9405912121.

समक्ष पोलीस स्टेशन भाग्यनगर, नांदेड येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे राहणारा असुन गुत्तेदारी व्यवसाय करतो. माझे कडे दोन पोकलेन मशीन आहेत, मी विहीर खोदकामाचे कॅन्ट्रक्ट घेवुन त्यापासुन मिळणारे उत्पन्नावर मी माझे कुटूंबाची उपजिवीका करतो.

दिनांक 18/05/2023 रोजी मौजे पांगरी, ता. हदगाव, जि. नांदेड येथील शिवारात विहीर खोदकामासाठी माझे कडील पोकलेन व्दारे काम चालु असताना माझे कामगारा पैकी एकाने माझे पोकलेन चे कॅबीन मधुन 1,36,700/- रु चोरुन नेले होते. त्यावरुन मी पोलीस स्टेशन मनाठा, ता. हदगाव, जि. नांदेड येथे गुन्हा रजिस्टर नंबर 56/2023 भांदवि कलम 381 प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन त्याचा तपास पोलीस उप निरीक्षक श्री कांबळे, मनाठा पोलीस स्टेशन यांचेकडे आहे.

त्यानंतर चार दिवसांनी माझे ताब्यातील पोकलेनचे कॅबीन मध्ये चोरीस गेलेले 1,36,700/- रु मिळुन आले. त्याबाबत मी पोलीस उप निरीक्षक श्री कांबळे, यांना भेटुन समक्ष सांगीतले. त्यावेळी श्री कांबळे यांनी मला आमचे काय ? असे म्हणुन तसेच नमुद गुन्हयात मला आरोपी न करण्यासाठी माझ्याकडे प्रथम 25,000/- रु ची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना एवढे पैसे माझेकडे होणार नाहीत असे म्हणुन मी पैसे देवु शकत नाही असे सांगीतले.

त्यानंतर पांगरी गावचे माजी सरपंच यांनी मला भेटुन सांगीतले की, पोलीस उप निरीक्षक श्री कांबळे यांनी 1 लाख रुपयेची मागणी केलेली आहे. तुम्ही पैसे दिले नाहीतर तुम्हाला आरोपी करणार असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी त्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर पोलीस उप निरीक्षक श्री कांबळे यांनी मला त्यांचे फोन नंबर 9923413244 यावरुन माझा मोबाईल क्रमांक 9405912121 याचेवर वेळोवेळी फोन केले. दिनांक 23/06/2023 रोजी व काल दिनांक 24/06/2023 रोजी 10:25 वा. माझे फोनवर सपर्क करुन पैशाची मागणी केली व मला प्रत्यक्ष येवुन भेटण्यास सांगीतले. पोलीस उप निरीक्षक कांबळे हे मागत असलेले पैसे लाच असल्याने मी दिनांक 24/06/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांचेकडे तकार दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने दिनांक 24/06/2023 रोजी पोनि श्री. अरविंद हिंगोले यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेवून मला दोन्ही पंचाची व सापळा पथकातील सर्व सदस्य पोनि श्री. बोडके, पोना/राजेश राठोड, पोशि/ सयद खदीर, पोशि/ ईश्वर जाधव, चापोहेकाँ/ मारोती सोनटक्के व दोन शासकीय पंच यांची ओळख करून दिली. त्यांनतर मी पंचाना माझी तोंडी तक्रार सांगितली. माझी टाईप केलेल्या तक्रारीवर मी सही केली असुन पंचानी वाचुन तक्रारीवर सहया केल्या आहेत. तसेच पोनि श्री अरविंद हिंगोले यांनी तक्रारीवर सही केली आहे. त्यानंतर मला व दोन्ही पंचाना लाच मागणी पडताळणीचा उद्देष सांगुन पोनि हिंगोले यांचे सुचेनेवरून पोशि/सय्यद खदीर यांनी माझे स्वतःचे, पोनि श्री. अरविंद हिंगोले व दोन्ही पंचाचे परिचय दर्शक वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकाँर्डरमध्ये रेकाँर्ड केले.

यादरम्यान लोकसेवक श्री. कांबळे, यांनी माझे मोबाईलवर फोन करून ते नांदेड येथील षेतकरी चैकात असुन तेथे मला येण्यास सांगितले. त्यामुळे पोनि हिंगोले यांनी मला व पंच क्र. 1.व्यंकटी लक्ष्मणराव इंद्रोड यांना सविस्तर सुचना देवून लाच मागणी पडताळणी करण्यासाठी लोकसेवक श्री. कांबळे, पोलीस उप निरीक्षक यांची भेट घेण्यासाठी शेतकरी चौक तरोडा नाका, नांदेड येथे पाठविले. त्यापूर्वी पोनि श्री अरविंद हिंगोले यांच्या सुचनेवरून पोकाँ/सयद खदीर यांनी डिजीटल व्हाँईस रेकाँर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाँईस रेकाँर्डर चालू करून दिल्याने मी व पचं क्र. 1 असे दोघे माझेकडील चारचाकी वाहन क्रमांक एमएच 16 सीक्यु-6509 मध्ये बसुन शेतकरी चौक, तरोडा नाका येथे गेलो. तेथे हाँटेल पदमावती मध्ये श्री. कांबळे, पोलीस उप निरीक्षक यांची भेट

झाली. त्यांनी माझेकडे 50,000/- रूपयाची मागणी केली. परंतु 50,000/-रूपये जास्त होतात काही कमी करा असे मी त्यांना विनंती केली असता त्यांनी तडजोडीअंती 30,000/- रूपये घेवुन येण्यास सांगुन लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना पैसे घेवुन येण्यासाठी वेळ मागुन घेतला व लाप्रवि नांदेड कार्यालयात हजर आलो. पोनि हिंगोले यांचे सुचनेवरून पोशि/सयद खदीर यांनी व्हॉईस रेकॉर्डर माझेकडुन घेवुन ते बंद केले व पंच क्रमांक 1 नंतर माझेकडे घडले घटने बाबत चौकशी करून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील पडताळणी दरम्यान ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले.

त्यावरून श्री. कांबळे, पोलीस उप निरीक्षक हे मागत असलेले पैसे लाच असल्याने पोनि श्री. हिंगोले यांनी सापळा लावण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयात सापळापुर्व कार्यवाही केली ज्यात मला व दोन्ही पंचाना पोना/राजेष राठोड यांनी अल्ट्राव्हॉयलेट लॅम्प व अँथ्रासिन पावरडचे गुणधर्म सांगुन त्याच्या वापराचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर पंचाकरवी माझी अंगझडती घेतली व मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेचे वर्णन व क्रमांक पंच क्रमांक 2 श्री प्रकाश साहेबराव सिंगरवाड यांच्या कडुन एका कागदावर लिहुन घेतले. त्यावर पोनि श्री. अरविंद हिंगोले व दोन पंचानी सहया केल्या. पोना/राजेश राठोड यांनी लाचेच्या रक्कमेस अँथ्रासिन पावडर लावले व सदर रक्कम माझे अंगावरील नेसनीस असलेल्या पॅन्टचे उजव्या बाजुचे समोरील खिशात ठेवली व लाच स्विकारल्यानंतर करावयाचा इशारा मला सांगुन तशी सविस्तर सापळा पुर्व कार्यवाही केली.

त्यानंतर पोनि श्री अरविंद हिंगोले यांच्या सुचनेवरून पोकॉ/सय्यद खदीर यांनी त्यांचे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून देवून माझे गळयात सुरक्षित ठेवले व त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे आम्ही दोघे माझेकडील चारचाकी वाहन क्रमांक एमएच 16 सीक्यु-6509 मध्ये रवाना होवुन शासकीय विश्रामगृह, मोर चौक, छत्रपती चैक मार्गे शेतकरी चौक तरोडा नाका येथे जावुन तेथे हॉटेल पद्मावती मध्ये लोकसेवक श्री. कांबळे, पोलीस उप निरीक्षक यांची भेट घेतली व मी माझ्या प्रकरणाबाबत त्यांचेशी चर्चा केली असता त्यावेळी श्री. कांबळे यांनी मला पैसे दे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यावेळी मी माझे जवळील अँथ्रासिन पावडर लावलेली 30,000/-रूपये रक्कम त्यांचे समोर धरली असता त्यांनी सदर रक्कम त्यांचे उजव्या हाताने घेवुन त्यांचे पॅन्टचे उजव्या बाजुचे समोरील खिशात ठेवली. त्यानंतर मी बाहेर येवून सापळा रचून थांबलेल्या पथकातील सदस्यांना लोकसेवक श्री कांबळे यांनी लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित ईशारा करताच आमचेवर लक्ष ठेवुन असलेले पोनि श्री. अरविंद हिंगोले, पोनि श्री. बोडके, पंच क्रमांक 2 व सापळा पथकातील सर्व सदस्य तेथे हजर येवुन लोकसेवक श्री कांबळे यांना 16:15 वाजताचे सुमारास पकडुन पुढील कार्यवाही केली.

तरी मनाठा पोलीस स्टेशन येथे दिनांक 18/05/2023 रोजी मी दाखल केलेल्या गुन्हयात मला आरोपी न करण्यासाठी लोकसेवक श्री. कांबळे, पोलीस उप निरीक्षक, पोलीस स्टेशन मनाठा, ता.हदगाव, जि.नांदेड, रा. घर नं. 1691, मायादेवी नगर, शिव रोड तरोडा बु. नांदेड, ता.जि.नांदेड यांनी दिनांक 24/06/2023 रोजी 14:32 ते 16:15 वाजेचे दरम्यान हॉटेल पद्मावती मध्ये शेतकरी चौक, तरोडा नाका नांदेड येथे शासकीय पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाहीत माझेकडे 50,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती माझेकडुन 30,000/- रूपये लाचेची रक्कम स्विकारून स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून स्वतःचा आर्थिक गैरफायदा करून घेतला. म्हणुन माझी त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे योग्य ती कायदेशीर कार्यवाही होणेस फिर्याद आहे.

समक्ष फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

suryamohan narayan bolmvad(I (Inspector)) / dgpsnbm8107 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
on **point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Khedkar R.

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पो. स्टे. भाग्यनगर, नांदेड

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): suryamohan naraya
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): dgpsnbm8107

पोलीस स्टेशन भाग्यनगर नांदेड